■ वर्ष- ११ ■ अंक- १० ■ मुंबई, मंगळवार,२१ जानेवारी ते २७ जानेवारी २०२५ ■ पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2
हिनाळ्यात
गूळासोबत
हरभरा
एक उत्तम
सुपरफुड

3 → फास्टॅगमुळे टोलनाक्यांवरील कोंडी फुटणार का?

मुंबईतून ८१ बांगलादेशी नागरिकांना अटक ← 4

www.policebatmipatra.in  policebatmi  police batmi patra  policebatmipatra  policebatmipatra@gmail.com

## विदर्भकन्येची आयुक्तपदी नियुक्ती, पालिका प्रशासनात आता महिला राज




**उल्हासनगर :** महापालिकेचे आयुक्त विकास ढाकणे यांची नुकतीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यालयात उपसचिव पदी नियुक्ती झाली आहे. त्यांचा उल्हासनगर महापालिकेतील कार्यकाळ अल्प ठरला. त्यांच्या बदलीनंतर उल्हासनगरच्या आयुक्त पदावर कुणाची वर्णी लागते? याची चर्चा रंगली होती. अशातच पुणे स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या मनीषा आव्हाळे यांची नियुक्ती झाली आहे. त्यांच्या नियुक्तीने उल्हासनगर महापालिकेला पहिल्यांदाच महिला आयुक्त मिळाल्या आहेत. तसेच मनीषा आव्हाळे यांच्या नियुक्तीने पालिका प्रशासनात महिला राजला चालना मिळाली आहे.

नगरपरिषदेचे रूपांतर 1996 साली उल्हासनगर महानगरपालिकेत झाले. तेव्हापासून पुरुष अधिका[illegible]यांना महानगरपालिकेत आयुक्तांचा आणि अधिकांश महिलांना महापौर पदाचा मान मिळाला आहे. मात्र महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच विदर्भकन्या आयएएस मनिषा आव्हाळे या महिला अधिका[illegible]याची आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी याबाबत आदेश जाहीर केले आहेत. त्यामुळे आता उल्हासनगर महापालिकेला आर्थिक शिस्त लावणे, शहरातील अनधिकृत बांधकामे आणि पुनर्विकासाचा महत्त्वाचा प्रश्न, रस्ते विकासासह शहरात सुरू असलेल्या कोट्यवधींच्या कामाचा दर्जा राखणे अशी अनेक आव्हाने मनीषा आव्हाळे यांच्यापुढे असणार आहेत. याशिवाय येत्या काळात उल्हासनगर महापालिका निवडणुका होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मनीषा आव्हाळे यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.

उल्हासनगर पालिका प्रशासनात महिला राज

दरम्यान, उल्हासनगर महानगरपालिकेत यापूर्वी प्रतिनियुक्तीवर अतिरिक्त आयुक्त विजया कंठे, करुणा जुईकर, उपायुक्त संगीता धायगुडे, प्रियंका राजपूत, सहायक आयुक्त मंगला माळवे यांनी पदभार हाताळला आहे. विद्यमान घडीला प्रतिनियुक्तीवर उपायुक्त विशाखा मोटघरे, सहायक आयुक्त मयुरी कदम कार्यरत आहेत. तर महानगरपालिकेतील विविध पदांवर सचिव प्राजक्ता कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे, कर निर्धारक व संकलक निलम कदम, प्रभारी प्रशासनाधिकारी कुंदा पंडित, प्रभाग समितीच्या सहायक आयुक्त अलका पवार, सलोनी निवकर, सिस्टम अनालिस्ट श्रद्धा बाविस्कर, मालमत्ता व्यवस्थापक मधुरा केणी, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागाच्या संजीवनी अमृतसागर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी मोहिनी धर्मा या महिला काम करत आहेत.

## पत्राचाळीतील विजेत्यांना देकार पत्र

**मुंबई :** म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या २०१६ च्या सोडतीतील गोरेगाव पश्चिम येथील सिद्धार्थनगर (पत्राचाळ) योजनेतील ३०५ घरांना नुकतेच भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) प्राप्त झाले आहे. त्यामुळे आता या घरांसाठीच्या विजेत्यांना तात्पुरते देकार पत्र वितरीत करण्याचा निर्णय मुंबई मंडळाच्या पणन विभागाने घेतला आहे. त्यानुसार मंगळवारपासून विजेत्यांना देकार पत्र वितरीत केले जाणार असून विजेत्यांच्या हक्काचे घराचे स्वप्न प्रत्यक्षात येणार आहे.

वादग्रस्त पत्राचाळ पुनर्विकासाअंतर्गत विकासकाने म्हाडाच्या हिश्श्यातील ३०५ घरांच्या कामाला सुरुवात करत हे कामही पुनर्वसित इमारतीप्रमाणेच अर्धवट सोडून दिले. या अर्धवट अवस्थेतील घरांचा समावेश तत्कालीन म्हाडा उपाध्यक्ष संभाजी झेंडे यांनी २०१६ सोडतीत केला. ही घरे सोडतीत समाविष्ट करण्यास विरोध असतानाही या घरांसाठी सोडत काढण्यात आली आणि त्याचा फटका या घरांच्या विजेत्यांना बसला. कारण या घरांचा ताबा मिळण्यासाठी विजेत्यांना तब्बल आठ वर्षे प्रतीक्षा करावी लागली. अर्धवट घरांचे काम मुंबई मंडळाने पूर्ण करून नुकतीच घरांसाठी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

घरांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्याने आता विजेत्यांना प्रत्यक्ष घरांचा ताबा देण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. पत्राचाळीतील विजेत्यांची पात्रता आधीच निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार ३०५ पैकी अंदाजे ३०२ पात्र विजेत्यांना मंगळवारपासून तात्पुरते देकार पत्र वितरीत केले जाणार आहे. देकार पत्र मिळाल्यानंतर घराची रक्कम भरत पुढील प्रक्रिया पूर्ण करणाऱ्यांना घराची चावी दिली जाणार असल्याची माहिती मुंबई मंडळातील अधिकाऱ्याने दिली. एकूण या विजेत्यांची आठ वर्षांची हक्काच्या घराची प्रतीक्षा अखेर आता संपल्याने ही बाब त्यांच्यासाठी नक्कीच दिलासादायक मानली जात आहे.

## 'एफडीए'चे संकेतस्थळ बंद; औषध विक्रेते, वितरक यांच्या परवानग्या रखडल्या



**मुंबई :** औषध विक्री व उत्पादनासंदभार्तील विविध परवाने मिळविण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे ऑनलाइन एप्लिकेशन पोर्टल आठवडाभरापासून बंद आहे. त्यामुळे दररोज पोर्टलवर करण्यात येणाऱ्या १०० ते १५० तक्रारी प्रलंबित आहेत.

औषध विक्री परवाना काढणे, त्याचे नूतनीकरण करणे, नवीन फार्मासिस्टच्या नावाचा समावेश करणे, जुन्या फार्मासिस्टचे नाव काढणे, नवीन उत्पादनाची नोंद करणे अशा अनेक बाबींना मंजुरी मिळविण्यासाठी औषध विक्रेते व उत्पादकांना अडचणी येत आहेत. अनेक बाबींसाठी अन्न व औषध प्रशासनाच्या संकेतस्थळावर असलेल्या 'एक्सएलएन महाराष्ट्र' या ऑनलाइन एप्लिकेशन पोर्टलवरून अर्ज करावा लागतो. संपूर्ण राज्यातून पोर्टलवर दररोज जवळपास १०० ते १५० अर्ज येतात.

राज्यामध्ये सुमारे ८० हजार औषध विक्रेते असून, १० हजार वितरक आणि एक हजार उत्पादक कंपन्या आहेत. यामध्ये मुंबईमध्ये सुमारे १५ हजार औषध विक्रेते, तीन हजार घाऊक विक्रेते आणि मुंबई प्रदेश महानगर परिसरात जवळपास ५० औषध उत्पादक कंपन्या आहेत. पोर्टल बंद असल्यामुळे या सर्वांनाच याचा फटका बसत असल्याची माहिती ऑल इंडिया फूड अँड ड्रग लायसन्स होल्डर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष अभय पांडे यांनी दिली.

**अडचणी कोणत्या?**

एफडीएच्या संकेतस्थळावरून औषध परवाना काढण्याच्या पोर्टलवरून परवाना नूतनीकरण व अन्य अर्ज करता येत आहेत. मात्र अर्ज केल्यानंतर शुल्क भरता येत नसल्याने प्रक्रिया पूर्ण होत नाही. ज्या विक्रेते, उत्पादक व वितरकांनी अर्जासह शुल्क भरले आहे, त्यांची चलान पावती मंजूर होत नाही, ज्यांची चलान पावती मंजूर झाली आहे, त्या अर्जावर प्रक्रिया होत नाही.

अन्न व औषध प्रशासनाचे संकेतस्थळ सुरू आहे. मात्र तांत्रिक अडचणींमुळे अर्ज करताना भरावे लागणारे शुल्क भरता येत नाही. हा प्रश्न सोमवारपर्यंत निकाली लावण्यात येईल. तसेच त्यावर तोडगा न निघाल्यास शुल्क भरण्यासाठी अन्य स्वतंत्र व्यवस्था करण्यात येईल. झ राजेश नार्वेकर, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन

## बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या नालासोपारा येथील महिलेवर पोलिसांनी केली कारवाई

**नालासोपारा-** अनधिकृतरित्या नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत वास्तव्यास असलेल्या एका महीला बांग्लादेशी नागरीकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- नालासोपारा पथकाची कारवाई. मिळालेल्या माहितीनुसार दिनांक ०९/०१/२०२५ रोजी अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना बातमीदारामार्फत नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील न्यू पाटणकर पार्क को. ऑप. हौ. सोसा. लि. पाटणकर पार्क नालासोपारा पश्चिम ता. वसई जि. पालघर या ठिकाणी बांगलादेशी नागरीक विनापरवाना राहत असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह न्यु पाटणकर पार्क को.ऑप.हौ.सोसा.लि नालासोपारा पश्चिम ता. वसई जि. पालघर या ठिकाणी सापळा रचुन ०१ महीला श्रीमती नेहरून अजीजुल शेख, वय ३७ वर्षे, सत्यम शॉपींग सेंटर च्या टेरेसवर, नालासोपारा रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म नं. १ च्या बाजुला, नालासोपारा पश्चिम, ता. वसई, जिल्हा पालघर, मुळ रा. लखोवटी, ता. बराकपुर, जि. खुलना, देश बांग्लादेश या बांग्लादेशी महीलेस ताब्यात घेवुन दुभाषीकामार्फत चौकशी केली असता, भारतात विनापरवाना सुमारे १७ वषार्पासून राहत असल्याची माहिती मिळाली. दुभाषीकामार्फत तिच्याकडे अधिक चौकशी केली असता चौकशीत तिने ती बांग्लादेशी नागरीक असल्याचे कबुल केल्याने तसा सविस्तर पंचनामा करुन तिस ताब्यात घेवुन सदर महीलेविरुद्ध सरकारतर्फे फिर्याद दिल्याने नालासोपारा पोलीस ठाणे दाखल करण्यात आला आहे.यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/ सौरभी पवार, मपोहवा / साक्षी डोईफोडे, पोहवा / रोशन किणी, पोहवा /महेंद्र शेटये, पोहवा / अमित चव्हाण, मपोशि/काजल पाटील, पोहवा / सुनिल पागी, सर्व नेम अनै. मा. वा. प्रति कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्टरित्या केली आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त महसूल कार्यालयांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा नागरिकांनी लाभ घ्यावा -जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

### नागरिकांना जास्तीत जास्त शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून होणार उपलब्ध

**ठाणे:-** राज्यातील नागरिकांना जास्तीत जास्त शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यासाठीची ऑनलाईन प्रणाली विकसीत करा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयात झालेल्या राज्य मंत्री परिषदेच्या बैठकीत दिली.

राज्यातील विविध विभागांच्या ९६९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी आपले सरकार पोर्टल वर ५३६ सेवा उपलब्ध आहेत. ९० सेवा संबंधित विभागांच्या पोर्टल वर उपलब्ध आहेत. मात्र सुमारे ३४३ सेवा ऑफलाईन पध्दतीने दिल्या जातात. त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 (सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.5 च्या कलम 3 (1) अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त महसूल कार्यालयांमार्फत नागरिकांना विविध सेवा पुरविण्यात येतात.

नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत काल मयार्दा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिल प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये (परिशिष्ट सोबत जोडले आहे) नमूद केल्याप्रमाणे या सेवांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

## येनी डिस्क एप डाऊन (Any Desk App ) लोड मधील फसवणूक झालेल्या तक्रार दरास पोलिसांनी सुमारे ९८,५७०/- रक्कम केली परत

**काशिमिरा-** Any Desk App डाऊनलोड करण्यास अनोळखी लिंक मोबाईलवर पाठवुन फसवणुक झालेल्या तक्रारदार यांना ९८,५७०/- रक्कम करण्यास सायबर पोलीस ठाण्यास यश . अधिक माहितीनुसार मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील काशिमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तक्रारदार श्री.विरा यांना त्यांच्या मोबाईलवर क्रेडिट कार्ड अपडेट करण्याकरीता अनोळखी लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंकवर क्लिक केले असता मोबाईलमध्ये एक एप डाऊनलोड झाले. त्यानंतर तक्रारदार यांचे क्रेडिट काडार्चे खात्यातुन ४८,५७०/- रु कपात झाल्याचा मॅसेज प्राप्त झाला. तसेच तक्रारदार श्री. शिंदे यांच्या व्हॉटअपवर एप डाऊनलोड करण्याबाबत लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंकवर क्लिक केल्यानंतर त्यांचे मोबाईलमध्ये अनोळखी एप डाऊनलोड झाले. त्यानंतर तक्रारदार यांच्या बँक खात्यातुन रक्कम ५०,००० /- रुपये कपात झाल्याबाबत मॅसेज त्यांना प्राप्त झाला. अश्याप्रकारे वरील तक्रारदार यांची आर्थिक फसवणुक झाल्यानंतर सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिल्याने सदरबाबत तात्काळ नोंद घेवुन NCCRP Portal वर ऑनलाईन तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP PortÔl वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक/ऑनलाईन पेमेंट गेटवे खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार यांच्या खात्यातुन वर्ग झालेली रक्कमेचे पुढील व्यवहार तात्काळ थांबवुन तक्रारदार यांची रक्कम मुळ खात्यात परत मिळविण्याबाबत संबंधीतांना पत्रव्यवहार करण्यात आला. अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी केलेल्या तात्काळ कारवाईचे अनुषंगाने उपरोक्त तक्रारदार यांची एकुण ९८,५७०/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

* बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.

* अनोळखी लिंक अगर मॅसेज प्राप्त झाल्यास पडताळणी केल्याशिवाय कारवाई करु नये.

* अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती / आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.

* ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि / स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, मपोअं/ स्नेहल पुणे, पोअं/ ओंकार डोंगरे, सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस, पोअं/ सावन शेवाळे, मपोहवा / माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

## जामिनावर सुटलेल्या व महाराष्ट्रात पलायन करणाऱ्या परप्रांतीय इसमास पोलिसांनी केली अटक

**काशिगाव -** खुनासारख्या गंभीर गुह्यात जामीनावर असलेला व आश्रया करिता भारतात पळालेल्या श्रीलंका देशातील आरोपीस अटक करण्यात काशीगांव पोलिस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.सविस्तर माहिती अशी कि मा. पोलीस उपायुक्त परीमंडळ ०१ मिरारोड दिनांक ०६/०१/२०२५ रोजीच्या आदेशानुसार पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक १३.१.२०२५ रोजी ऑल आउट कोबिंग ऑपरेशन राबिवण्यात आले होते.वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तोगरवाड यांच्या मार्गदर्शनाखील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी पोउनि/ अभिजीत लांडे, किरण बघडाणे, पो. हवा /प्रताप पाचुंदे, पोशि/ नामदेव देवकत्ते पोशि/ उमंग चौधरी, पो. शि/ सुनिल ठाकुर असे कोम्बींग ऑपरेशच्या अनुषंगाने पाहिजे व फरारी आरोपी पकडणे,हिस्ट्रीशिटर यांच्यावर निगराणी ठेवणे तसेच पोलीस स्टेशनच्या हद्दीत हॉटेल व लॉजची तपासणी इत्यादी कर्तव्य पार पाडत असतांना वेस्टर्न हॉटेल/लॉजींग, काशिगाव, मिरारोड पु. ता. जि. ठाणे येथे हॉटेलमध्ये आलेल्या ग्राहकांच्या नोंदीचे रजीस्टर तपासणी करीत असतांना तेथील लॉजींग मॅनेजर अल्ताफ शेख यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी पोउनि /अभिजीत लांडे,यांना त्यांच्या ग्राहकामध्ये दिनेशकुमार हा संशयास्पद असल्याचे त्यांनी सांगितले त्यावेळी पोउनि लांडे यांनी दिनेश कुमार अय्यर वय ३६ वर्षे या इसमाचे आधारकार्ड चेक केले असता आधारकार्ड संशयास्पद असल्याचे दिसुन आले. त्यांनी हॉटेल मॅनेजर यांना दिनेश कुमार यांचा रुम चेक करावायाचे असे सांगुन तो असलेल्या रुम क्रमाक ३०६ येथे मॅनेजर सह गेले, त्याठिकांणी जावुन दिनेश कुमार अय्यर याचेकडे विचारपुस करत असतांना त्याने त्याचे मुळ राहण्याबाबतचा पत्ता तो सांगु शकला नाही त्यावेळी पोउपनि /लांडे यांना सदर इसमाच्या हावभाव बोलचाल बाबत संशय बळावल्याने त्याचाकडे अधिकची चौकशी केली असता त्याने तो श्रीलंका देशाचा नागरीक असल्याचे सांगितले त्यावेळी त्यास विश्वासात घेवुन त्याचे मुळ नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव अरुमाहद्दी जनिथ मदुसंघा



डिसिल्वा वय ३६ वर्षे, रा. एन ०६, टेम्पल रोड, टेलवाथा, देश श्रीलंका असे सांगितले त्याचे सदर ठिकाणी येणेबाबतचे कारण व शासकीय परवानगी, पासपोर्ट व्हीझा याबाबत त्यास विचारणा केली असता त्याचेकडे भारत देशामध्ये येण्याचे कोणतेही परवानगी पासपोर्ट व व्हीझा नसल्याचे त्याने सांगितले त्यास पोउपनि / किरण बघडाणे यांनी भारतामध्ये कोणत्या प्रवासीसाधनाचा वापराने प्रवेश केला असे विचारले असता त्याने ३१.१२.२०२४ रोजी समुद्रामार्गे बोटीतुन भारतीय तटरक्षक दलाची नजर चुकवुन भारतामध्ये तमीलनाडु राज्यामध्ये प्रवेश करुन, तमीळनाडु राज्यातुन बस व रेल्वेने मुंबई, ठाणे येथे आल्याचे सांगितले तसेच त्याला भारतात येण्याचा उद्देश काय आहे याबाबत त्याच्याकडे तपास केला असता त्याने सन २०१५ मध्ये स्थानिक टोळीच्या वादातुन श्रीलंकामध्ये खुनाचा गुन्हा केला असुन सदर गुन्ह्यात डिसेंम्बर २०२४ मध्ये श्रीलंकेच्या न्यायालयाने त्याला त्यांच्या गुन्ह्यात जामीन दिला आहे. जामीनावर श्रीलंकेच्या तुरुंगाच्या बाहेर आल्यावर तो आश्रया करिता भारतात आला असल्याचे त्याने सांगितले आहे.तरि नमुद विदेशी नागरीकास ताब्यात घेवुन त्याच्या विरुद्ध काशिगांव पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, अटक आरोपी सध्या पोलीस कस्टडी रिमांडमध्ये असुन त्याच्याकडे त्याला भारतात प्रवेश करण्या करिता कोणी मदत केली तसेच त्याच्याकडे असलेले आधारकार्ड, मोबाईल सिमकार्ड त्याला कोणी दिले याबाबत तपास काशिगांव पोलीस स्टेशनचे दहशतवाद विरोधी कक्षाचे पोलीस उप निरीक्षक सचिन शेंडगे हे करत आहे. सदरची कामगिरी श्री.प्रकाश गायकवाड, पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग, महेश तोगरवाड, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, काशिगांव पोलीस स्टेशन, किरण बघडाणे, अभिजीत लांडे,पोलिस उप निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण शाखा तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार पो. हवा / प्रताप पांचुदे, पो. शि विक्रांत खंदारे,पो. शि. उमंग चौधरी,, पो शि. किरण विरकर, पो. शि. रविन्द्र सोनावणे, पो. शि. नामदेव देवकाते, पो.शि. आभिषेक मढावी,पो.शि.सुनिल ठाकुर यांनी केली आहे.

पोलीस बातमी पत्र
विविध
२
मुंबई, मंगळवार, २१ जानेवारी ते २७ जानेवारी २०२५

# हिवाळ्यात गूळासोबत हरभरा एक उत्तम सुपरफूड



हिवाळ्यात शरीराला उबदारपणा आणि अतिरिक्त ऊर्जा आवश्यक असते. गूळ आणि हरभरा यांचे मिश्रण एक उत्तम सुपरफूड आहे. गुळातील लोह, कॅल्शियम आणि खनिजे शरीराला ऊर्जा देतात, तर हरभरा प्रथिने आणि फायबरने समृद्ध आहे. दोन्ही मिळून थंडीत शरीर उबदार ठेवण्यास मदत होते. चला जाणून घेऊया हिवाळ्यात या सुपर फूडचे सेवन करण्याचे इतर कोणते फायदे आहेत.

## गूळ आणि हरभरा खाण्याचे फायदे

**रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त-**

गूळ आणि हरभऱ्यामध्ये असलेले पोषक तत्व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात. विशेषत: हिवाळ्यात सर्दी आणि खोकल्यापासून तुमचे संरक्षण करते.

**पचन सुधारते-**

हरभऱ्यामध्ये भरपूर फायबर असते, जे पचनसंस्था मजबूत करते. गुळामुळे पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठतासारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**ऊर्जेचा उत्कृष्ट स्रोत-**

गुळामध्ये नैसर्गिक साखर असते जी त्वरित ऊर्जा प्रदान करते. हरभरा हळूहळू ऊर्जा सोडतो, ज्यामुळे तुम्हाला दिवसभर उत्साही राहते.

**वजन कमी करण्यास उपयुक्त -**

हरभऱ्याच्या सेवनाने पोट दीर्घकाळ भरलेले राहण्यास मदत होते, त्यामुळे वारंवार खाण्याची सवय नियंत्रित राहते. हे वजन कमी करण्यास उपयुक्त आहे.

**गूळ आणि हरभरा खाण्याची योग्य पद्धत**

नाश्त्यात गूळ आणि भाजलेले हरभरे एकत्र मिसळून खाऊ शकता. सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन केल्याने शरीराला अधिक फायदा होतो. गुळात कॅलरीज जास्त असल्याने जास्त खाऊ नये याची काळजी घ्या.

**खबरदारी कोणी घ्यावी?**

मधुमेही रुग्णांनी गुळाचे सेवन मर्यादित प्रमाणात करावे. याशिवाय ज्यांना गॅस्ट्रिकची समस्या आहे त्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच याचे सेवन करावे.

# आवळ्याच्या पाण्याची वाफ घ्या



## सर्दी आणि घसादुखीपासून त्वरित आराम मिळवा

हिवाळ्यात सर्दी, घसा खवखवणे आणि त्वचेच्या समस्या सामान्य होतात. अशा परिस्थितीत आवळा पाण्याची वाफ घेणे हा एक प्रभावी आणि नैसर्गिक उपाय आहे. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी, अँटीऑक्सिडेंट आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे सर्दीशी लढण्यास मदत करतात.

**आवळा पाण्याची वाफ घेतल्याने फायदे होतात**

१. सर्दी आणि खोकल्यापासून आराम

आवळा वाफेमुळे बंदनाक खुलते आणि सर्दी-खोकल्यापासून सुटका मिळण्यास मदत होते.

२. घसा खवखवणे बरे करते

आवळा पाण्याची वाफ घेतल्याने घशातील सूज आणि दुखणे कमी होते.

३. सायनसच्या समस्यांपासून आराम

आवळ्याची वाफ सायनस साफ आणि शांत करण्यास मदत करते.

४. फुफ्फुस साफ करणे

ही वाफ फुफ्फुसात साचलेली घाण आणि श्लेष्मा साफ करते, ज्यामुळे श्वास घेणे सोपे होते.

५. त्वचा चमकदार बनवा

आवळ्याच्या पाण्याची वाफ त्वचेला खोलवर स्वच्छ करते आणि चमकदार बनवते.

६. प्रतिकारशक्ती वाढवा

आवळ्यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते, ज्यामुळे हिवाळ्यात रोगांचा धोका कमी होतो.

७. मायग्रेनपासून आराम

आवळ्याच्या पाण्याची वाफ घेतल्याने डोकेदुखी आणि मायग्रेनच्या लक्षणांपासूनही आराम मिळतो.

८. मानसिक ताण कमी करा

गरम वाफ घेतल्याने आराम मिळतो आणि तणाव कमी होतो.

**आवळा पाण्याची वाफ घेण्याची योग्य पद्धत**

एका भांड्यात २-३ लिटर पाणी गरम करा. २-३ चमचे आवळा पावडर पाण्यात टाका. आपण ताजे आवळे देखील वापरू शकता. आपले डोके भांड्यावर ठेवा आणि टॉवेलने झाकून ठेवा. ५-१० मिनिटे हळूहळू वाफ घ्या. हे दिवसातून १-२ वेळा करा.

**सावधगिरी**

- वाफ घेतल्यावर लगेच थंड हवेत जाऊ नका.
- खूप गरम वाफ घेणे टाळा.
- श्वास घेण्यास त्रास होत असल्यास ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.

आवळा पाण्याची वाफ घेणे हिवाळ्यात एक सोपा आणि प्रभावी घरगुती उपाय आहे. हे केवळ सर्दी आणि घसा खवखवणे बरे करत नाही तर रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास आणि त्वचा चमकदार बनविण्यास मदत करते. आपल्या दैनंदिन दिनचर्येत त्याचा समावेश करा आणि निरोगी रहा.

# मोसंबीचा ज्यूस पिण्याचे फायदे आणि तोटे



मोसंबी, एक फळ जे आपल्या आंबट चव आणि सुगंधाने सर्वांना आकर्षित करते. हे केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. मोसंबीच्या रसामध्ये व्हिटॅमिन सी, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, ज्यामुळे शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो. चला जाणून घेऊया मोसंबी ज्यूसचे फायदे आणि तोटे. मोसंबीच्या रसाचे फायदे:

१. प्रतिकारशक्ती वाढवते: मोसंबीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. हे शरीराला संसर्गापासून वाचवण्यास मदत करते.

२. पचन सुधारते: मोसंबीमध्ये फायबर असते, जे पचन सुधारण्यास मदत करते. बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे.

३. त्वचेसाठी फायदेशीर: मोसंबीमध्ये अँटिऑक्सिडेंट असतात, जे त्वचा निरोगी आणि चमकदार बनवण्यास मदत करतात. मुरुम, डाग आणि त्वचेची जळजळ कमी करण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे.

४. रक्तदाब नियंत्रित करते: मोसंबीमध्ये पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी हे फायदेशीर आहे.

५. किडनी स्टोनला प्रतिबंध करते: मोसंबीमध्ये सायट्रिक ॲसिड असते, जे किडनी स्टोन तयार होण्यास प्रतिबंध करते.

६. वजन कमी करण्यास मदत करते: मोसंबीमध्ये कॅलरी कमी आणि फायबर जास्त असते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

७. ॲनिमियापासून बचाव करते: मोसंबीमध्ये लोह असते, जे ॲनिमियापासून बचाव करण्यास मदत करते.

**मोसंबी ज्यूसचे तोटे:**

१. एसिडिटी वाढू शकते: मोसंबी आंबट आहे, त्यामुळे त्याचे जास्त सेवन केल्याने एसिडिटी वाढू शकते.

२. दातांना हानी पोहोचवू शकते: मोसंबीचा रस दातांची इनॅमल कमकुवत करू शकतो.

३. ॲलर्जी होऊ शकते: काही लोकांना मोसंबीची ॲलर्जी असू शकते.

४. गर्भधारणेदरम्यान सावधगिरी: गर्भवती महिलांनी मोसंबीचा रस कमी प्रमाणात प्यावा, कारण यामुळे गर्भपात होण्याचा धोका वाढू शकतो.

**मोसंबीचा रस कसा प्यावा:**

ताजे तयार केलेले मोसंबी रस पिणे चांगले. तुम्ही त्यात थोडे मध किंवा मीठ घालून रस पिऊ शकता. त्याचा रस थंड झाल्यावर पिणे चांगले.

मोसंबीचा रस अनेक आरोग्य फायद्यांनी परिपूर्ण आहे. हे रोग प्रतिकारशक्ती वाढवते, पचन सुधारते, त्वचेसाठी फायदेशीर आहे आणि इतर अनेक आरोग्य समस्या टाळते. मात्र, अतिसेवनामुळे आम्लपित्त वाढून दात खराब होतात. त्यामुळे मोसंबीचा रस कमी प्रमाणात प्यावा.

# हिवाळ्यात स्वतःला हायड्रेट ठेवण्यासाठी या टिप्स करा फॉलो



जेव्हा जेव्हा थंडी येते तेव्हा आपले कपडे किंवा जीवनशैलीच बदलते असे नाही तर आपल्या खाण्याच्या सवयी देखील बदलतात. बाहेर कडाक्याच्या थंडीत पुन्हा पुन्हा काहीतरी गरम प्यायची इच्छा होते आणि आपण खूप कमी पाणी पितो, त्यामुळे शरीरात पाणी कमी होण्याची शक्यता खूप वाढते. आपल्या सर्वांना माहीत आहे की ऋतू कोणताही असो, शरीरातील हायड्रेशन लेव्हलची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे असते.

या ऋतूत सतत पाणी पिणे हे नेहमी ध्यानात येत नसल्यामुळे तुमचे शरीर हायड्रेटेड राहावे यासाठी तुम्ही तुमच्या आहारात आणि जीवनशैलीत काही बदल करणे फार महत्वाचे आहे. त्याचबरोबर हिवाळ्याचा आनंदही लुटता येतो. तर आज या लेखात थंडीच्या दिवसात तुमच्या शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी कोणत्या पद्धतींचा अवलंब करू शकता ते सांगत आहोत-

**हिवाळ्यातील कोमट पाणी प्या**

थंडीच्या दिवसात शरीराला हायड्रेट ठेवायचे असेल तर या ऋतूत होणारी लालसाही समजून घेतली पाहिजे. या ऋतूमध्ये पाणी पिण्यास थंड वाटते म्हणून आपण ते टाळतो. त्यामुळे फक्त कोमट पाणी पिण्याचा प्रयत्न करा. हे केवळ तुम्हाला अधिक आरामदायक वाटत नाही तर तुमच्या शरीराची प्रणाली देखील हलके वाटते. जर तुम्हाला नुसते पाणी प्यायचे नसेल तर शरीरातील हायड्रेशनची काळजी घेण्यासाठी कॅमोमाइल, पेपरमिंट किंवा तुळशीचा चहा देखील पिऊ शकतो.

**अलर्ट ऑन करा**

स्वतःला हायड्रेट ठेवण्याचा हा एक मार्ग आहे तो म्हणजे आपल्या मोबाईलमध्ये पाण्यासाठी अलर्ट ऑन करुन ठेवा. वॉटर ड्रिंकिंग अलार्म सेट केल्याने वेळेवर मोबाईल तुम्हाला पाणी पिण्याची आठवण करुन देईल. किंवा जेवणापूर्वी एक ग्लास पाणी पिण्याचा नियम करा. यामुळे शरीर हायड्रेट राहण्यास मदत होते.

**चव वर अवलंबून**

थंडीच्या दिवसात पाणी पिण्याची इच्छा कमी होते. विशेषतः जर पाणी पूर्णपणे साधे असेल तर काही फरक पडत नाही. अशा स्थितीत तुमच्या साध्या पाण्याला चव चाखायला द्या. आपण विविध औषधी वनस्पती आणि फळांच्या मदतीने इन्फ्यूज्ड वॉटर तयार करू शकता. हे प्यायला छान लागते आणि इतर अनेक फायदे देखील देतात.

**सूप प्या**

हिवाळ्यात भाज्यांची बहार असते. अशात दररोज आपल्या आवडीचे सूप बनवून प्या. याने देखील वॉटर इनटेक वाढेल आणि शरीराला पौष्टिक पदार्थ मिळतील.

# संपादकीय

# फास्टॅगमुळे टोलनाक्यांवरील कोंडी फुटणार का?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक




भारतीयांसाठी फास्टॅग संकल्पना काही अगदीच नवीन नाही. भारतात फास्टॅगची सुरुवात १ ऑगस्ट २०१४ मध्ये झाली. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर या प्रणालीची सुरुवात करण्यात आली. येथे या प्रणालीची यशस्वी अंमलबजावणी झाल्यानंतर ४ नोव्हेंबर २०१४ रोजी दिल्ली-मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील काही टोलनाक्यांवर फास्टॅग लागू करण्यात आले. हळूहळू देशभरातील सर्वच टोलनाक्यांवर फास्टॅगची अंमलबजावणी करण्यात येऊ लागली. कालांतराने केंद्र सरकारने वाहनचालकांसाठी फास्टॅग बंधनकारक केले. फास्टॅग नसल्यास दुप्पट टोल आकारण्यात येतो. फास्टॅग ही इलेक्ट्रॉनिक टोल गोळा करण्याची प्रणाली आहे. या प्रणालीत रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन (आरएफआयडी) तंत्रज्ञान वापरले जाते. फास्टॅग वाहनाच्या विंडस्क्रीनवर (समोरच्या काचेवर) चिकटवलेला असतो. टोलनाक्यावर हा फास्टॅग स्कॅन केला जातो. फास्टॅग हा वाहनचालकाच्या बँक अंकाऊंटला लिंक असल्याने टोलचे पैसे थेट त्यातून कापले जातात. केवळ भारतच नाही, तर जगभरातील अन्य देशांमध्येही फास्टॅगची संकल्पना राबविण्यात येत आहे.

टोलनाक्यांवरील पथकर वसुली ही पारदर्शक, जलदगतीने आणि विनाविलंब होण्याच्या उद्देशाने ही संकल्पना उत्तमच आहे, परंतु का कुणास ठाऊक फास्टॅग आल्यानंतर जवळपास १० वर्षे उलटली तरी आपल्याकडील टोलनाक्यांवरील वाहतूक कोंडी काही कमी झालेली नाही. याउलट ती दुर्दैवाने अधिक वाढत असल्याचे अनेकदा पाहावयास मिळते.

सरकारने फास्टॅग बंधनकारक केल्यानंतर अनेक वाहनचालकांनी फास्टॅग करून घेतले, परंतु अनेकदा टोलनाक्यांवर येर्णाया तांत्रिक तुटींमुळे ही प्रणाली यशस्वीरित्या काम करत नसल्याचा अनुभव येतो. फास्टॅग लावल्यानंतर ते व्यवस्थितरित्या स्कॅन होत नसल्याने अनेक वाहनचालकांना थांबून राहावे लागते. खरे तर वाहने टोलनाक्यावरून जाताना फास्टॅग हे आपोआप (ऑटोमॅटिक) स्कॅन होणे अपेक्षित असते, परंतु अनेकदा ते ऑटोमॅटिक स्कॅन करत नाही.

त्यामुळे वाहनचालकांना थांबावे लागते. स्कॅन न झाल्यास टोलनाक्यावरील कर्मचारी हे एक स्कॅनर मशीन घेऊन वाहनाच्या काचेवरील फास्टॅग स्टिकरचा बारकोड स्कॅन करतात. फास्टॅग स्कॅन झाल्यानंतर वाहनचालकांना पुढे जाता येते, परंतु या सर्व प्रक्रियेला काही वेळ निश्चितपणे जातो. त्यामुळे मूळ उद्देश सफल होत नाही. टोलनाक्यांवर वाहने विनाविलंब आणि जलदगतीने पुढे जावीत, यासाठी फास्टॅग आणण्यात आले होते, परंतु यामुळे जर वाहनचालकांना टोलनाक्यांवर थांबावेच लागत असेल, तर त्याचा नेमका उपयोग काय?

अनेकदा आपल्याकडे वाहनचालकांची तक्रार अशी असते की, ज्या टोलनाक्यांवरून लहान वाहने टोलमुक्त झाली आहेत तेथून जातानाही फास्टॅग स्टिकर ऑटोमॅटिक स्कॅन होतो. त्यामुनळे टोलचे पैसे थेट बँक खात्यामधून कापले जातात. टोलमुक्ती झाल्यानंतरही टोलचे पैसे कापले जातात, हे काही योग्य नाही. ज्या टोलनाक्यांमधून लहान वाहनांना सूट देण्यात आली आहे, अशी वाहने या टोलनाक्यावरून जाताना त्यांचे फास्टॅग हे ऑटोमॅटिक स्कॅन न होण्याची प्रणाली अजूनही आपल्याकडे अनेक टोलनाक्यांवर नाही. ती तात्काळ अंमलात आणणे गरजेचे आहे.

तसेच या गैरसोयीमुळे आपसूक पैसे कापले गेल्यास कालांतराने ते परत करण्याची कुठली सुविधाही उपलब्ध नाही. त्यामुळे फास्टॅगविरोधात वाहनचालकांचा रोष दिवसेंदिवस वाढत आहे. अनेकदा तर गाडी रस्त्यावर पार्किंगसाठी उभी असतानाही फास्टॅगमुळे बँक खात्यातील पैसे कापले जात असल्याचा वाईट अनुभव वाहनचालकांना येतो. फास्टॅग स्टिकवरील बारकोड स्मार्ट वॉचच्या माध्यमातून काही लहान मुले, अन्यथा काही ठग स्कॅन करून पैसे आपल्या खात्यात वळते करतात.

याचा कटू अनुभवही सुरुवातीच्या काळात वाहनचालकांना येत होता. हे प्रकार वाढीस लागल्याचे निदर्शनास येताच फास्टॅगमध्ये बदल करण्यात आले. फास्टॅग थेट बँक खात्याशी जोडण्याऐवजी ते प्रीपेड स्वरूपात वापरण्याची मुभा वाहनचालकांना देण्यात आली. या सोयीनुसार वाहनचालकांना टोलच्या रकमेइतकेच फास्टॅग रिचार्ज करता येते आणि टोलचे पैसे भरणे सुलभ होते. अधिकचा बॅलेन्स ठेवण्याची गरज नाही. त्यामुळे वाहनचालकांची आर्थिक फसवणूक होत नाही. रिचार्जची सुविधा ही वाहनचालकांसाठी काही प्रमाणात दिलासादायक असली, तरी अनेक टोलनाक्यांवरील फास्टॅग स्कॅन करताना निर्माण होर्णाया तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठीही तातडीने प्रयत्न होणे गरजेचे आहेत. अन्यथा फास्टॅगनंतरही आपल्याकडील टोलनाके हे स्लोटॅगसारखेच कार्यरत असलेले दिसतील. टोलनाक्यांवरील वाहनांच्या रांगा या वाढलेल्याच दिसतील आणि वाहतूक कोंडीही काही कमी होणार नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने १ एप्रिल २०२५ पासून सर्व टोलनाक्यांवर वाहनांना फास्टॅग बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने याआधीच राष्ट्रीय महामार्गांवरील टोलनाक्यांवर वाहनांसाठी फास्टॅग हे बंधनकारक केले आहे. फास्टॅग नसल्यास वाहनचालकांकडून दुप्पट टोल आकारण्यात येतो. तसेच आता राज्यातही होणार आहे.

राज्य सरकारच्या अखत्यारीतील विविध महामार्गांवरील टोलनाक्यांवरून जाताना आता फास्टॅग असणे बंधनकारक असून ते नसल्यास दुप्पट टोल वाहनचालकांना भरावा लागणार आहे. सरकारच्या या निर्णयाची अंमलबजावणी कशी होते आणि वाहनचालक सरकारच्या या निर्णयाला कसा प्रतिसाद देतात, हे येणारी वेळच ठरवेल. आधीच टोलचे दर हे भरमसाठ असल्याने वाहनचालकांमध्ये याबाबत रोष असतो.

आतापर्यंत अनेक राजकीय पक्षांकडून निवडणुकांआधी टोलमाफीच्या आश्वासनांची खैरात करण्यात आली आहे, परंतु राज्यात पूर्णपणे टोलमाफी काही झालेली नाही. एक्सप्रेस वे, समृद्धी महामार्ग आदींवर तर टोलची रक्कम ही अधिक आहे. २०० ते २५० च्या घरात येथे टोलचे दर आहेत. या महामार्गांवरून जाण्या-येण्याच्या टोलच्या रकमेची बेरीज केली असता तो खर्च हजारांच्या घरात जातो.

टोलवसुली करर्णाया खासगी कंपन्या या वाहनचालकांकडून हजारोंच्या घरात टोलवसुली करतात, परंतु त्याबदल्यात वाहनचालकांना तितक्या प्रमाणात सुविधा मिळतात का, याचाही विचार होणे गरजेचे आहे. मुंबई-गोवा महामागार्चे काम आपल्याकडे गेल्या १८ वर्षांपासून सुरू आहे. या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम कधी पूर्ण होणार, हे देवालाच ठाऊक. महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही, परंतु या महामार्गावर टोलनाके कुठे कुठे उभारायचे आहेत, याची प्रशासकीय तयारी आधीपासूनच झालेली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील अनेक टोलनाके उभारणीला ग्रामस्थांनी विरोध केल्याचे आपल्याला पाहायला मिळाले. ग्रामस्थांच्या रोषामुळे अद्याप तेथे टोलवसुली सुरू झालेली नाही. जेथपर्यंत महामागार्चे चौपदरीकरण झाले आहे, तेथपर्यंत टोल आकारण्याचा मानस होता. तशी टोलनाक्यांची उभारणीही झाली, परंतु आधीच रखडलेल्या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाचा रोष आणि टोल आकारण्याला होणारा ग्रामस्थांचा विरोध यामुळे सध्या तरी तेथे टोल आकारणी सुरू झालेली नाही. जर येथे टोल आकारणी सुरू झाली, तर कोकणवासीय पेटून उठल्याशिवाय राहणार नाहीत. कारण, या महामार्गाच्या चौपदरीकरणाला जितका वेळ लागला तितका वेळ कदाचित देशातील कोणत्याही अन्य महामार्गाच्या कामासाठी लागलेला नसावा. आणखी किती वर्षे महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरू राहणार, हे कुणालाही सांगता येणार नाही, परंतु या महामार्गाच्या उभारणीला जितका वेळ लागणार तितक्या उशिराने येथे टोलवसुली शासन सुरू करणार का, असा प्रश्न कोकणवासीय विचारत आहेत.

कारण, शासनाला टोलवसुली ही जलदगतीने म्हणजेच फास्टॅगने हवी असते, परंतु महामार्ग उभारणीचे काम, त्यांचे चौपदरीकरण आदी मात्र वर्षानुवर्षे रखडते. याबाबत मात्र स्लोटॅग. भरमसाठ टोल घेऊनही महामार्गावरील विविध आवश्यक सुविधा पुरविण्याचे काम मात्र कासवगतीने होत असते. महामार्गावर खड्डा पडल्यास तो बुजविण्यासाठी अनेक दिवस वाट पहावी लागते. या खड्ड्यांमुळे अपघात घडून अनेकदा वाहनचालकांचे मृत्यूही ओढवतात. इतका गंभीर प्रश्न असून आपल्याकडे ही कामे जलदगतीने होताना पाहावयास मिळत नाहीत. त्या तुलनेत टोल आकारण्याचे निर्णय मात्र अगदी फास्ट घेतले जातात.

# काम महत्त्वाचेच, पण जगणे अधिक महत्त्वाचे...




एल. अँड टी. या विख्यात आस्थापनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुब्रमण्यम यांनी देशातील तरुणांना 'रविवारी सुट्टी न घेता ९० तास काम करा' असा सल्ला दिल्याचे वृत्त माध्यमात झळकत होते. कुणी या बातमीवर टीका केली, तर कुणी तिची टर उडवली. (दिवसभर बायकोच्या चेहऱ्याकडे काय बघत बसणार? ही सुब्रमण्यम यांची टिप्पणी तर निव्वळ पुरुषी मानसिकता दर्शवणारी होती. शिवाय एखाद्याला आवडत असेल बायकोबरोबर वेळ घालवणं तर ते कोण आक्षेप घेणार? ही बातमी पाहताच मनात विचार आला एवढ्या मोठ्या पदावर बसलेल्या आणि भरभक्कम पगार घेणाऱ्या व्यक्तीला तळागाळात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या भावना लक्षात का येत नसतील? अमाप पैसा प्रसिद्धी ऐशो आरामाची उपलब्ध साधने आल्यानंतर ही मोठी माणसं विचार करण्याची क्षमता गमावतात का? असा प्रश्न माझ्यासारख्या व्यक्तीला सर्वसामान्य नागरिक आणि कर्मचारी म्हणून पडणे स्वाभाविक आहे.

भारतावर शेकडो वर्ष राज्य करून गेल्यानंतर ब्रिटिशांची गुलामगिरीची पद्धत आज देखील भारतात कॉर्पोरेटच्या नावाखाली चालू असल्याचे अनेक उदाहरणे सातत्याने समोर येत राहतात त्यापैकीच मध्यंतरी पुण्यात एका तरुणीचे कामाचा ताण न सहन झाल्याने मृत्यू झाल्याचे ऐकिवात आले होते. त्यावर जास्त चर्चा झाली नाही. या प्रकरणी कोणत्याही मोठ्या आस्थापनेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी विराजमान असलेल्या कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याकडून चकार शब्द देखील काढण्यात आलेला नाही. माणसाला जगत असताना जेवढे काम महत्त्वाचे आहे, तेवढेच कुटुंब आणि सामाजिक जीवन देखील महत्त्वाचे आहे आणि याचे भान या मोठ्या अधिकाऱ्यांना राहिल्याचे दिसून येत नाही. प्रत्येक मिनीट, प्रत्येक तास फक्त काम आणि काम हीच गोष्ट त्यांच्या डोक्यात सुरू असते. आपले कर्मचारी कोणत्या तणावातून जात आहेत, त्यांच्या अपेक्षा काय आहेत हे कधीही जाणून घेण्याचा प्रयत्न हे अधिकारी करताना दिसून येत नाहीत. प्रत्येक वेळी कर्मचाऱ्यांवर कोणत्या ना कोणत्या कारणाने दबाव आणून काम करून घेण्यातच हे धन्यता मानत असतात. यापैकी एखाद्या कर्मचाऱ्याला दबाव सहन झाला नाही, तर त्याच्यावर शिस्तभंग कारवाई करून घरचा रस्ता दाखवण्यासही हे मागेपुढे पाहत नाहीत.

आपल्याकडे जेवढी शारीरिक आजाराबद्दल केली जाते तेवढी मानसिक आजाराबद्दल चर्चा केली जात नाही. परंतु आजकालच्या या युगात मानसिक आरोग्य देखील महत्त्वाचे आहे आणि ते नीट ठेवायचे असेल तर सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण जिथे काम करतो तिथले वातावरण हे संतुलित हवे. काम करण्याच्या ठिकाणातील संतुलित वातावरण हे त्या कर्मचाऱ्यांच्या आयुष्यावर परिणाम करत असते आणि हेच वातावरण असंतुलित असेल तर कुटुंबकलह, वाद विवाद असे प्रकार मानसिक आरोग्य बिघडल्यानंतर पाहायला मिळतात. बहुतांश प्रकरणात मानसिक आरोग्य बिघडण्यास दिवसभर काम करताना येणारे दडपण व दबाव हेच कारणीभूत असतात ज्याची चर्चा देखील समाज माध्यमात या वरिष्ठ अधिकऱ्यांकडून होणे अपेक्षित आहे. मध्यंतरी इन्फोसिसचे नारायण मूर्ती यांनी देखील कामाचे तास वाढवण्याबाबत सूतोवाच केले होते. परंतु त्याबरोबरच त्यांनी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सोयी सुविधा, पगार वाढ, आरोग्यविषयक विमा या सर्व गोष्टींची देखील चर्चा करणे व यामध्ये काय सुधारणा करता येऊ शकतील याबाबत बोलणे गरजेचे होते. परंतु या महत्त्वाच्या गोष्टींची चर्चा झालीच नाही. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, कॅनडा या विकसित देशांमध्ये कर्मचाऱ्यांकडून आठवड्यामध्ये ३५ तास काम करून घेतले जाते आणि भारतात कर्मचाऱ्यांकडून आठवड्यातून सरासरी ४६ तास काम करून घेतले जाते. कमी वेळात उत्पादनक्षम काम कसे करावे याचा आदर्श या देशांकडून घेणे अपेक्षित असताना फक्त आणि फक्त तास वाढवून कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम कसा होईल याचाच विचार हे वाचाळवीर उच्चपद अधिकारी करताना दिसून येतात. ज्या देशात नागरिक आनंदी असतात, त्या देशात सर्व सुखसुविधा नांदतात. याचं उत्तम उदाहरण पाहायचं असेल तर काही दिवसांपूर्वी २०२४ चा आनंदी निदेशांक अहवाल प्रसिद्ध झाला होता त्यामध्ये भारताचा क्रमांक हा १४३ वा होता इस्त्राइलसारख्या देशात वारंवार युद्धजन्य परिस्थिती असतानाही इस्त्राइलचा क्रमांक हा चार होता. युद्धजन्य परिस्थितीत देखील तेथील लोक आनंदी राहू शकतात तर आपण भारतात का आनंदी राहू शकत नाही याचा विचार करणे गरजेचे आहे. फक्त कामाचे तास वाढवून उत्पादन क्षमता वाढत नाही त्यासाठी कर्मचाऱ्यांचे मानसिक आरोग्य, कौटुंबिक स्वास्थ्य देखील महत्त्वाचे आहे आणि त्याचा विचार करून उच्चपद अधिकाऱ्यांनी वक्तव्यं करायला हवीत.


**वसई विरार शहर महानगरपालिका**
**प्रभाग समिती जी वालीव**
**वालीव नाका, वसई (पुर्व)**
**ता.वसई, जि. पालघर पिन 401208**

**मुख्य कार्यालय : विरार (पुर्व)**
**दुरध्वनी :- 0250-2525101/02/03/05/06**
**फॅक्स :- 0250 - 2525107**
**जावक क्र. : वविशम ३१६३/२०२४/२५**
**दिनांक १६/०१/२०२५**

**जाहिर नोटीस**

वसई विरार शहर महानगरपालिका सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन सात (7) दिवसांचे आत लेखी हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणा-या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | गोखिवरे | GK03/4782/33 | हिमाचल उ पाल व प्रविणा पाल | अनिशा फि कस्से व फिलीप ब कस्से |
| 2 | गोखिवरे | GK05/4021/2 | टायकॉन डेवहलपर्स तर्फे मागी रोहित सु सर्वे व इतर | आय डी टी फॅशन ट्रिमिंगम प्रायवेट लि. निलम रतनदिप सावंत |
| 3 | गोखिवरे | GK05/14021/4 | टायकॉन डेवहलपर्स तर्फे मागी रोहित सु सर्वे व इतर | आय डी टी फॅशन ट्रिमिंगम प्रायवेट लि. निलम रतनदिप सावंत |
| 4 | गोखिवरे | GK05/14021/6 | टायकॉन डेवहलपर्स तर्फे मागी रोहित सु सर्वे व इतर | आय डी टी फॅशन ट्रिमिंगम प्रायवेट लि. निलम रतनदिप सावंत |
| 5 | गोखिवरे | GK05/14021/8 | टायकॉन डेवहलपर्स तर्फे मागी रोहित सु सर्वे व इतर | आय डी टी फॅशन ट्रिमिंगम प्रायवेट लि. निलम रतनदिप सावंत |
| 6 | गोखिवरे | GK01/13607/32 | स्वस्तिक रिअलटर्स | निशती आ काती व आकाश रि काती |
| 7 | गोखिवरे | GK03/7889/67 | मंजुला दु अजय दुधात अमिज दुधान | अमृतलाल अ पटेल व अनिता अ पटेल |
| 8 | गोखिवरे | GK03/13715/54 | मिरा रिअलटर्स | प्रशांत राय |
| 9 | गोखिवरे | GK07/12858/7 | मोहममद मुस्ताक | धर्मात्मा चं प्रजापती व मुन्नीदेवी प्रजापती |
| 10 | गोखिवरे | GK05/1400/6 | ॲलेकस गॅब्रीयल रॉडीकस | ट्रवर सावियो रोड्रीकस |
| 11 | गोखिवरे | GK08/13535/327 | तययब अली | रोहित रमेश मौर्या |
| 12 | गोखिवरे | GK08/13535/326 | तययब अली | रविंद्र कुमार पटेल |
| 13 | गोखिवरे | GK03/13609/205 | अगरवाल रिअलटर्स | लक्ष्मी र विशवकर्मा व रमाशंकर विशवकर्मा |
| 14 | गोखिवरे | GK04/13608/22 | एस एस बिलडर्ल | कमलेश जो यादव व अभिशेक यादव |
| 15 | गोखिवरे | GK01/12678/2 | हुसैन अब्बास मुल्ला | मोहममद आलम अहमद शेख |
| 16 | गोखिवरे | GK06/13708/82 | जेसी फर्नांडिस | स्नेहल र मदने व शैला स्ने मदने |
| 17 | गोखिवरे | GK06/13968/102 | अजमेरा डेवहलपर्स | इग्नेशियस डलीमा व लॉरेनस डलीमा |
| 18 | गोखिवरे | GK06/14007/90 | अजमेरा डेवहलपर्स | हेमंत गौ माळी व हर्षदा हे माळी |
| 19 | गोखिवरे | GK06/13968/18 | अजमेरा डेवहलपर्स | उजवल रविद्रबहदुर मौर्या |
| 20 | गोखिवरे | GK05/13591/19 | संदानंद एस दास | सदानंद एस दास व खुशी स दास |

**सही /-**
**सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती 'जी'**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# मुंबईतून ८१ बांगलादेशी नागरिकांना अटक

## नववर्षातील पहिल्याच १० दिवसांतील पोलिसांची कारवाई

**मुंबई :** बांगलादेशातील राजकीय अस्थिरता व तेथील हिंदूवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे भारतातील राजकीय वातावरणही संवेदनशील होवू लागले आहे. या काळात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिक भारतात घुसखोरी करीत असून मुंबई पोलिसांनाही बांगलादेशी नागरिकांविरोधात विशेष मोहीम राबवत आहेत. त्याअंतर्गत वर्षाच्या पहिल्या १० दिवसांतच ८१ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. गेल्या तीन वर्षांत मुंबईतून ९०० हून अधिक बांगलादेशी नागरिकांना पकडण्यात आले आहे. देशात अवैधरित्या राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांविरोधात मुंबई पोलीस विशेष मोहीम राबवत असून त्याअंतर्गत गेल्यावर्षी एकट्या मुंबईतून ३०४ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली होती. त्यापूर्वी २०२३ मध्ये मुंबईतून ३७६ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली होती. या कारवायांदरम्यान, बहुसंख्य बांगलादेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांद्वारे भारतीय आधारकार्ड व पारपत्र बनवल्याचे आढळून आले आहे. गेल्या तीन वर्षांत मुंबई पोलिसांनी सुमारे ९०३ बांगलादेशी नागरिकांना अटक केली. परंतु न्यायालयीन प्रक्रियेमुळे केवळ २२२ बांगलादेशी घुसखोरांना मायदेशी पाठवता आले. यावर्षी पहिल्या १० दिवसांतच मुंबई पोलिसांनी ८१ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी ५२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अटक बांगलादेशी नागरिकांमध्ये ६२ पुरूष आणि १९ महिलांचा समावेश आहे.

बांगलादेशी नागरिकांना अटक केल्यानंतर त्यांना मायदेशी पाठण्याच्या प्रक्रियेला अनेक वर्षे लागतात. त्या काळात घुसखोर बांगलादेशी नागरिक विविध सरकारी योजनांचा फायदा घेतात. त्यांच्या बँक खात्यातून बेकायदा व्यवहारही झाल्याचे दिसून आले आहे. याशिवाय अनेक बांगलादेशी भारतात स्थिर झाल्यानंतर ते इतर बांगलादेशी घुसखोरांना भारतात स्थायिक करण्याचे बेकायदेशीर काम करतात. त्यामुळे घुसखोरांना कागदपत्रे व मदत पुरवणाऱ्या संपूर्ण साखळीविरोधातच कारवाई करण्यास एटीएसने सुरूवात केली आहे. त्या अंतर्गत संशयीत बांगलादेशी नागरिकांची बँक खाते बंद करण्याबाबत बँकांना नोटीस पाठवण्यास सुरूवात करण्यात आली आहे. याशिवाय भारतीय शिधावाटप पत्रिका, चालकपरवाने रद्द करण्याबाबतही संबंधित विभागांशी पत्रव्यवहार करण्यात येतो. याशिवाय परिवहन विभागाशीही संपर्क साधून अशा संशयीतांचे चालकपरवानेही रद्द करण्यात येत आहेत. त्यामुळे बांगलादेशी घुसखोरांचे भारतातील वास्तव्यावर मयार्दा आणण्याचे काम हाती घेण्यात आला आहे. त्यासाठी बांगलादेशी घुसखोरांची सर्वबाजूंनी कोंडी करण्यात येत असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

**वर्ष - गुन्हे दाखल - अटक - पुरूष - महिला - मुले**

- २०२३ - २२३ - ३७१ - ५८ - ८ - १
- २०२४ - २१६ - ३०४ - १४३ - १८ - ३
- २०२५ - ५२ - ८१ - ६२ - १९ - -



## डोंबिवलीत बांगलादेशी महिलांना अटक

कल्याण : भारतात राहण्याची कोणतीही अधिकृत कागदपत्रे नसताना भारतात घुसखोरी करून डोंबिवली जवळील शिळफाटा रस्त्यावरील कोळेगावात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या तीन बांगलादेशी महिलांना उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी शिताफीने अटक केली आहे. शिळफाटा रस्त्यावरील काटई नाक्याच्या बाजुला कोळेगाव आहे. कोळेगावातील कृष्णा मंदिराच्या मागे अनिल पाटील चाळीत या तीन महिला राहत होत्या. कोळेगावात बांगलादेशी महिला राहत असल्याची माहिती उल्हासनगर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांना मिळाली होती. त्यांनी तात्काळ एक पथक स्थापन केले. या महिला कोळेगावात राहतात का, त्या कोणत्या व्यवसाय करतात याची पहिले गुप्त माहिती काढली. या माहितीची खात्री झाल्यानंतर उल्हासनगर गुन्हे शाखेचे पथक कोळेगावात दाखल झाले. त्यांनी अनिल पाटील चाळीत राहत असलेल्या रोजीना सुकूल अली (२९), तंजिला खेतून रज्जाक शेख (२२), शेफाली बेगम शेख (२३) यांना अटक केली. त्या बांग्लादेशातील अभयनगर उपजिल्ह्यातील खुलना विभागातील रहिवासी आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडे भारतात निवास करण्यासाठी लागणारी पारपत्र, प्रवासी वैध कागदपत्रे यांची मागणी केली. ती त्यांच्याकडे नव्हती. भारत-बांग्लादेश सीमेवरून चोरून लपून या महिलांनी भारतात घुसखोरी करून प्रवेश मिळविला असल्याचे पोलीस तपासात उघड झाले. या महिलांविरुध्द विदेशी व्यक्ति अधिनियमाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या महिलांची अधिक चौकशी करण्यासाठी त्यांना मानपाडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी, उपनिरीक्षक प्रवीण खोचरे, हवालदार प्रकाश पाटील, शेखर भावेकर, कुसूम शिंदे, मनोरमा सावळे, विक्रम पाटील, प्रसाद तोंडलीकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## अंधेरीत बांधकाम व्यवसायिकाला पालिकेकडून नोटीस

## इमारतीचे पाडकाम थांबवण्याचे आदेश




**मुंबई :** अंधेरी पश्चिमेकडील पी टंडन मार्गावरील एका इमारतीचे पाडकाम सुरू असून या कामादरम्यान प्रदूषण नियंत्रणासाठीचे कोणतेही नियम पाळलेले नाहीत. त्यामुळे या परिसरात प्रचंड धूळ पसरत आहे. बेदरकारपणे इमारतीचे पाडकाम करणाऱ्या संबंधित विकासकाला मुंबई महापालिकेच्या के पश्चिम विभागाने नोटीस पाठवली आहे. तत्काळ पाडकाम थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अंधेरी पश्चिमेकडील पी टंडन मार्गावरील संगम या इमारतीचा पुनर्विकास करण्यात येत आहे. त्यासाठी इमारतीचे पाडकाम सध्या सुरू आहे. तेथील कामाची पालिकेच्या विभाग कार्यालयातील पथकाने पाहणी केली असता वायू प्रदूषण नियंत्रणाच्या नियमावलीचे कोणतेही नियम पाळले जात नसल्याचे आढळून आले. मुंबईच्या वातावरणातील हवेचा स्तर बिघडू लागल्यामुळे पालिका प्रशासनाने गेल्यावर्षी कृती आराखडा जाहीर केला होता. तसेच यावर्षीही २८ मुद्द्यांची नियमावली जाहीर केली. त्यात बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी कोणते नियम पाळावेत याबाबत सांगितले आहे. बांधकाम प्रकल्प हा चोहोबाजूनी उंच पत्र्याने तसेच हिरव्या कापडाने झाकलेला असावा, राडारोडा झाकलेला असावा, धूळ उडू नये म्हणून सातत्याने पाणी फवारणी करावी असे नियम घालण्यात आले आहेत. मात्र १ जानेवारी रोजी पालिकेच्या पथकाने केलेल्या पाहणीत यापैकी कोणतेही नियम पाळले जात नसल्याचे आढळून आले. त्यामुळे पालिकेच्या के पश्चिम विभागाने संबंधित व्यावसायिकाला मुंबई महापालिका अधिनियमाच्या

### उल्हासनगर न्यायालयात चपलांच्या खोक्यातून गांजा पुरवण्याचा प्रकार

## अज्ञात आरोपीचे न्यायालयाच्या खिडकीतून उडी घेत पलायन



**उल्हासनगर :** उल्हासनगर न्यायालयात सुनावणीसाठी हजर करण्यात आलेल्या एका आरोपीला चपलांच्या बॉक्समधून गांजा पुरवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघड झाला. मात्र गांजा पुरवणारा अज्ञात इसम न्यायालयाच्या पहिल्या मजल्यावरील खिडकीतून उडी मारून फरार झाला आहे. या घटनेनंतर आरोपींना यापूर्वीही गांजा पुरवला गेला का तसेच नेमका हा गांजा आरोपीसाठी होता की आणखी कुणासाठी असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. उल्हासनगरच्या विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत हत्येचा प्रयत्न करण्याच्या गुन्ह्यात अटक असलेला आरोपी हर्षद सकट याला उल्हासनगर न्यायालयात सुनावणीसाठी हजर करण्यात आले होते. सुनावणी संपल्यानंतर हर्षदला एका अज्ञात व्यक्तीने चपलांचा बॉक्स दिला. पोलिसांच्या निरीक्षणात ही घटना येताच त्यांनी तत्काळ त्या चपलेच्या बॉक्सची तपासणी केली. तपासणी दरम्यान चपलेमध्ये लपवून ठेवलेला तब्बल २५० ग्रॅम गांजा आढळून आला. गांजा सापडल्यानंतर पोलिसांनी अज्ञात इसमाला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्या व्यक्तीने चतुराईने न्यायालयाच्या पहिल्या मजल्यावरील सिमेंटची खिडकी तोडली आणि तेथून उडी मारून फरार झाला. या घटनेने न्यायालयात उपस्थित पोलीस अधिकारी आणि नागरिकही चक्रावले. मध्यवर्ती पोलीस ठाण्यात या प्रकरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हर्षदला गांजा देण्याचा प्रयत्न नेमका कशासाठी करण्यात आला, याचा तपास सुरू आहे. अंमली पदार्थ फक्त हर्षदसाठी होता की त्याच्या माध्यमातून आधारवाडी कारागृहातील इतर कैद्यांना गांजाचा पुरवठा करण्याचा डाव होता, याचा शोध पोलीस घेत आहेत. या घटनेनंतर उल्हासनगर न्यायालयाच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अंमली पदार्थांचा न्यायालयात शिरकाव होणे, आरोपीच्या मदतीसाठी बाहेरून तस्करांची उपस्थिती हे चिंतेचे विषय आहेत. न्यायालय परिसरात सुरक्षेची उपाययोजना वाढविण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने पावले उचलली आहेत. फरार झालेल्या अज्ञात इसमाला पकडण्यासाठी पोलीस पथके तयार करण्यात आली असून, न्यायालयाच्या सुरक्षेच्या त्रुटी दूर करण्यासाठी उपाययोजना हाती घेतल्या जातील. तसेच, आरोपी हर्षद सकटच्या संपकार्तील व्यक्तींची चौकशी करून अंमली पदार्थ तस्करीच्या नेटवर्कचा पदार्फाश करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची प्रतिक्रिया पोलीस प्रशासनाने दिली आहे.

## कल्याणमधील पत्रीपुलाजवळ प्रतिबंधित कोडीन औषधाच्या बाटल्या जप्त

**कल्याण :** कल्याण येथील पत्रीपुलाजवळील कचोरे गाव हद्दीत कोडीनयुक्त प्रतिबंधित औषधांच्या १९२ बाटल्या टिळकनगर पोलिसांनी दोन जणांकडून जप्त केल्या आहेत. या दोन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. गेल्या आठवड्यात कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात बाजारपेठ पोलिसांनी कारवाई करून कोडीनच्या ४० बाटल्या जप्त केल्या होत्या. गुंगी, नशा येण्यासाठी या प्रतिबंधित औषधाचा वापर केला जात असल्याचा संशय पोलिसांना आहे. याप्रकरणात इरफान इनामुद्दीन शेख (३१), सोहेल हारून शेख (२३) यांना पोलिसांनी अटक करून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. टिळकनगर पोलीस ठाण्याचे हवालदार गौतम जाधव यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी संध्याकाळी हा प्रकार पोलिसांनी उघडकीला आणला. पत्रीपुलाजवळील कचोरे गाव हद्दीत शिवमंदिराच्या पाठीमागील बाजूस प्रतिबंधित कोडीन औषधाच्या बाटल्या उघड्यावर विकल्या जात असल्याची माहिती टिळकनगर पोलीस ठाण्यातील पोलिसांना समजली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम आणि सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तेथे दोन इसम कोडीन औषधांच्या बाटल्या घेऊन उघड्यावर बसले होते. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे मानवी शरीरास अपाय करणाऱ्या सरकारने प्रतिबंधित केलेल्या कोडीनच्या १९२ बाटल्या पोलिसांना आढळल्या. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या परवानगीविना या औषधांची बेकायदा विक्री केल्याबद्दल पोलिसांनी दोघांना अटक केली. त्यांच्यावर टिळकनगर पोलीस ठाण्यात औषधीद्रव्य आणि सौंदर्यप्रसाधन कायद्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इरफान, सोहेल हे दोन्ही इसम पत्रीपुलाजवळील होम बाबा टेकडी, गोविंदवाडी रस्ता भागात राहतात.या औषधांची किंमत ४३ हजार रुपए आहे.

## विमानांमध्ये बॉम्ब असल्याची चिठ्ठी, गुन्हा दाखल

**मुंबई :** गोव्यावरून मुंबईत येणाऱ्या विमानात बॉम्ब असल्याची चिठ्ठी सापडल्याची घटना सोमवारी घडली. याप्रकरणानंतर सर्व यंत्रणांना सतर्क करण्यात आले. परंतु तपासणीत काहीच संशयास्पद सापडले नाही. याप्रकरणी एअरपोर्ट पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार अभिजीत सावंत एका खासगी विमान कंपनीत सहाय्यक व्यवस्थापक (सुरक्षा) पदावर कार्यरत आहेत. त्यांना सोमवारी रात्री गोव्याहून मुंबईला येणाऱ्या विमानाच्या शौचालयात एक चिठ्ठी सापडली. त्यात काळजी घ्या, बॉम्ब असे लिहिण्यात आले होते. दुसऱ्या बाजूला सूड असे लिहिण्यात आले होते. दोन्ही मजकूर इंग्रजीत लिहिण्यात आले होते. विमान मुंबई विमानतळावर पोहोचण्यापूर्वी २० मिनिटे एका प्रवाशाला ती चिठ्ठी सापडली. त्याने तातडीने याबाबतची माहिती विमान कर्मचाऱ्यांना दिली. याबाबत वैमानिकाला सांगितल्यानंतर त्यांनी विमानतळाशी संपर्क साधून घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर विमानतळावर बॉम्ब शोधक व नाशक पथक, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, विमानतळ सुरक्षा पथक तैनात करण्यात आले. विमान आयसोलेट बे येथे उभे करून सर्व प्रवाशांना सुखरूप खाली उतरवण्यात आले. त्यानंतर विमानाची तपासणी केली असता कोणतीही संशयीत वस्तू सापडली नाही. याप्रकरणी संशयीत चिठ्ठी पोलिसांनी ताब्यात घेतली असून सावंत यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निळ्या रंगाच्या शाई पेनाने धमकीचा संदेश लिहिण्यात आला होता. प्रवाशांमध्ये भीती निर्माण करण्याच्या हेतून आरोपीने हा प्रकार केला असून त्याबाबत विमानतळ पोलीस तपास करत आहेत.


## वसई विरार शहर महानगरपालिका

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वसई-विरार शहर महानगरपालिका — स्थापना : ३ जुलै २००९

प्रभाग समिती 'एच' नवघर- माणिकपूर
ता. वसई, जि. पालघर ४०१ २०२

दुरध्वनी : ०२५०-२३३४३५४
ई -मेल : amch.vvmc@gov.com
जा.क्र. वविशम/६३०८/२०२४-२५
दिनांक : १५/०१/२०२५

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ ला अधिन राहुन या नोटीसीद्वारे वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी सदर हरकत / तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे विकणा-याचे किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर ५/२ | VN13/32196 | हिम्मतलाल मनशारामजी राठोड | केवलचंद हिम्मतमल राठोड व इतर १ |
| २ | दिवाणमान ४ | VN25/7906 | लुजैन लॉरेन लिगोरी डिसोजा व इतर १ | लीना लिगोरी डिसोजा |
| ३ | माणिकपूर १/१ | VN15/33329 | धीरज आर सिंह व सोनी धीरज सिंह | संतोष चुन्नीलाल व सुशीला संतोष |
| ४ | दिवाणमान ४ | VN25/7812 | लुजैन लिगोरी डिसोजा व लियान लिगोरी डिसोजा | लीना लिगोरी डिसोजा |
| ५ | माणिकपूर १/२ | VN16/62387/15 | शांती होम्स रियल्टी एलएलपी | विल्सन अगस्टिन वाझ |
| ६ | नवघर ५/१ | VN12/30691 | हफीझा रियाझ मीदीकी व इतर २ | रुची अशोक शाह व व्योमा कृणाल मिठानी |
| ७ | दिवाणमान ६/१ | VN28/14843 | चंदन चिमणलाल देढिया | पुष्पा जयप्रकाश पांडे व रिता विजयप्रकाश पांडे |
| ८ | माणिकपूर १/२ | VN16/62387/8 | शांती होम्स रियल्टी एलएलपी | ब्लेसिया डेनिस वाझ |
| ९ | ब-हामपुर | VN14/58495 | सुलोचना यशवंत माणके | संजय यशवंत माणके व इतर २ |
| १० | दिवाणमान ५/२ | VN27/12962 | तनस्वी तृषांत राऊत | उदय एम शेट्टी व शुभलक्ष्मी उदय शेट्टी |
| ११ | दिवाणमान ४ | VN25/62618/30 | प्रीती संजय मानकर | कौशल अरविंद पानसुरीया व इतर ३ |
| १२ | नवघर २/१ | VN07/42609 | फरहान हसीन खान व इमरान हसीन खान | रंजीत कुमार अशोक कुमार व इतर १ |
| १३ | दिवाणमान ६/१ | VN28/15112 | मार्था ओरडेट परेरा | यामिनि ब्रदेश कंसोरा व ब्रदेश डि कंसारा |
| १४ | दिवाणमान २ | VN23/1388 | प्रकाश सेबॅस्टियन लोपीस | भेरु सिंह राठोड |
| १५ | दिवाणमान २ | VN23/1388 | प्रकाश सेबॅस्टियन लोपीस | बाबूलाल मुलाराम चौधरी व रुपी बाबुलाल चौधरी |
| १६ | माणिकपूर १/२ | VN16/62387/22 | शांती होम्स रियल्टी एलएलपी | थॉमस अगस्टिन वाझ |
| १७ | नवघर २/१ | VN07/42603 | जुझर मोहसिनभाई धांगद्रावाला व इतर १ | परवैज इकरम खान |
| १८ | चुळणा | VN02/57089 | प्रकाश चंद्र दास व नमिता प्रकाश दास | चंद्रकला शिवाजी शेट्टी |
| १९ | नवघर २/१ | VN07/27549 | गोविंद बी पालण | चंम्पा कुटीकाडन |
| २० | दिवाणमान ५/२ | VN27/12874 | गुणाजी शंकर तानवडे व अश्विनी गुणाजी तानवडे | लेन्झील अनिल डिसा |

**(जोसेफ मिनेजीस)**
**कर अधिक्षक**
**प्रभाग समिती 'एच'**
**वसई विरार शहर महानगरपालिका**


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com